हिंदुस्थान संपादकीय

मंगळवार, दि. १५ ऑक्टोबर २०२४

कोलांट उडी

लहानपणी कोलांट उडी मारण्यात मजा येत असे. त्या वयातील लहान मुले, मुली एकत्र जमली की कोलांटउड्या मारण्यात कसा वेळ निघून जात असे कळत नव्हते. गादीसह गादीवर टाकलेली चादर अस्ताव्यस्त झाली की मोठे अरे, अरे काय केलेत म्हणुन ओरडत असत. आता कोलांट उड्या लहान वयातील जवळपास संपल्या असल्या तरी राजकारण्यांच्या कोलांट उड्या दिवसागणिक वाढत आहे. त्यामुळे राजकीय व्यवस्था किती विस्कळीत होते, अस्ताव्यस्त होते हे सांगण्याची गरज नाही.

महाराष्ट्राचे राजकारणात सध्या अशा उड्या मारण्याचे प्रमाण वाढले आहे. मुळ पक्ष व विचारधारा याला कांहीही किंमत राहिली नाही. स्वार्थ पूर्ण न झाल्यास पक्ष सोडणे, निष्ठा बदलणे जणू कोलांटउड्या सारखे झाले आहे आणि असा पक्ष बदल करतांना भ्रमनिराश झाला. जनतेची, शेतकऱ्यांची, बेरोजगारांची या पक्षाला कांही किंमत नाही म्हणुन पक्ष सोडल्याचे निर्लज्जपणे पक्ष बदलणारे सांगत असतात. म्हणुन ''निर्लज्जम् सदा सुखी'' असे म्हटल्या जाते. पक्ष व निष्ठा बदलतांना या नेत्यांना काही वाटत नाही. निष्ठा हा प्रकारही आता इतिहास जमा होऊ लागला आहे.

ज्या पक्ष व नेत्यांवर जातीयवादी मनुवादी असे आरोप करतांना आतुन मात्र याच पक्षासोबत निवडणुक समझौता करणाऱ्या नेत्यांची संख्याही कमी नाही. जरांगे पाटलांच्या आंदोलनाने अशा आरोप करणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत गेली. काल परवा पर्यंत एका विशिष्ट धर्मियांविरुध्द आग ओकणारे सत्तेसाठी इतके लांगूलचालन करतील असे स्वप्नातही वाटले नव्हते. याचा परिणाम मतदारांवर किती होतो हे समजणे कठीण आहे. दुर्दैव असे की आपण किती रिकामे आहोत हे समजेनासे झाले आहे. नेत्याने हूं करावे व आपण आंदोलन करावे. अनेकांना आपण असे कां करित आहोत याचीही कल्पना नसते. आजकाल फोटोला जोडे मारणे, फाडणे असे प्रकार वाढले आहे. यामुळे काहीही साध्य होत नाही हे जाणून घेणे गरजेचे आहे. याच्यात फायदा मात्र ''हूं'' म्हणणाऱ्या नेत्यांचा होतो. जनता हा तमाशा रोज अनुभवत असते. त्यांनाही अशा उड्या मारणाऱ्या कार्यकर्त्यांची सवय झाली आहे.

बच्चुभाऊंनी आपली इमेज ॲग्रीमॅन म्हणुन निर्माण केली आहे. सुरुवातीला कांही वर्षे त्यांना राग कां येतो हे जनतेला समजत नव्हते जेव्हा ते समजावयास लागले तेव्हा कांही दिवस ''ये भी बात सही है'' असे वाटत होते. बच्चुभाऊंचा सरकारी कार्यालयातुन जनतेची कामे न होण्या विरुध्दचा संताप काही दिवस बरा वाटला. अपंगांना मदतीचा त्यांचा कळवळा जनतेला पटावयास लागला. २०१९ नंतर झालेल्या राजकीय नाट्यात कडू पवार साहेबांच्या तंबूत बसले. यहां दाल गलना मुश्किल है हे त्यांच्या लक्षात आले. कारण त्यांच्यापेक्षा मातब्बर गरीबी, बेकारी, शेतकरी आत्महत्या, जात धर्माचे बुजगावणे उभे करणाऱ्यांची संख्या बरीच होती. त्यांचे समोर बच्चुभाऊ नांवाप्रमाणे स्वत:ला समजावयास लागले. यहां दाल गलना बहुत कठीण बात है हे लक्षात येताच शिंदे साहेबांच्या यात्रेत ते वारकरी झाले. खोके अन् ओके सोबत माझा संबंध नाही हे त्यांना सांगण्याची वेळ आली.

कडू साहेबांनी शिंदेच्या तंबुत बस्तान मांडण्याचा प्रयत्न केला. अपंगांसाठी त्यांनी मदत करा म्हणुन आदळ आपट केली. लहान बाळाला आई बाबा घे म्हणतात तसेच शिंदेनी त्यांना अपंगांसाठी मांगोगे वो मिलेगा म्हणुन सर्व कांही दिले, महत्वाची खुर्ची दिली.

आता विधानसभा निवडणुका जवळ येताच बच्चुभाऊंनी पुन्हा कोलांट उडी मारली अन् तिसऱ्या गटाचे तंबुत बसले. २८८ जागा तिसरी आघाडी लढवेल अशी घोषणा केली. पहिल्या दोन आघाडीत बिनसले असे दिसते असे म्हणावयास हरकत नाही. बच्चुभाऊ आगे बढो म्हणणारे भरपुर आहेत. त्यामुळे फुगा फुटणार हे निश्चित पण पुढे पवार साहेब, शिंदे साहेब, फडणवीस साहेब यांनाच चॅलेंज देणे म्हणजे जरा अतिशयोक्ती वाटते. तिसऱ्या आघाडीशिवाय सरकार येणार नाही याचा अर्थ सौदेबाजीला वाव आहे असे म्हणावे लागेल. ठिक आहे गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाही तर खाऊन टाकली, आपले पोट तर भरते अन् नाहीच जमले तर इतरांसारखी कोलांटउडी घेऊ काही फरक पडत नाही हो नां?

शे'ती' चं सध्या काय चाललंय

आमचं घर पश्चिमाभिमुख, त्यामुळे उतरतीचे ऊन समोरच्या खोलीत येते पण यंदा दक्षिणायन सुरु झालं आणि रोज सकाळी ७ वा. च्या सुमारास या खोलीत सकाळची कोवळी उन्ह येऊ लागली. 'पश्चिमेला सूर्य उगवला की काय' असं थट्टेने म्हणतो पण आताशा खरंच अनुभवायला येतंय. असं का होतंय याचा शोध घेतला तर लक्षात आलं की आमच्या घराच्या पुढे दुसऱ्या रस्त्यावर नवीन झालेल्या घराला बाहेरून सुशोभीकरण म्हणून काचा लावल्या आहेत त्यावरून उगवतीची सूर्यकिरणं परावर्तीत होऊन आमच्या पश्चिमाभिमुख घरात येतात. आहे की नाही चमत्कार. पण मनात विचार आला आपला जसा गोंधळ झाला तसा सूर्योदय आणि सूर्यास्त यांच्या वेळेनुसार ज्यांचे संपूर्ण जीवन अवलंबुन असते त्या पशु पक्ष्यांना हा मानवी चमत्कार नक्कीच बुचकळ्यात टाकत असेल. हल्ली इमारतींना बाहेरून काचा लावण्याची खूप फॅशन आहे पण या काचांमुळे वातावरणाचे तापमान वाढते याचे कुणालाच भान नाही. एकीकडे किती गर्मी होते म्हणायचं आणि दुसरीकडे गर्मी वाढवणारी कामं आपणच करायची असं होतंय.

पृथ्वीभोवती विविध वायूंचे आवरण आहे त्याला वातावरण म्हणतात या वातावरणातील बहुतेक सगळे वायु पारदर्शक आहेत त्यामुळे सूर्यकिरणे या वातावरणातून आरपार प्रवास करून जमिनीपर्यंत येतात जमीन अपारदर्शक असल्याने जमीन या सूर्याच्या उष्णतेने तापते अर्थात ही क्रिया दिवसा घडते. दिवसा घेतलेली उष्णता जमीन रात्री उत्सर्जित करते म्हणून जमिनीचे तापमान कायम राहते. वातावरणातील कार्बन डायऑक्साईड, ओझोन, धुळीचे कण, बाष्प यासारखे काही घटक मात्र अपारदर्शक असतात त्यामुळे उष्णतेचे शोषण करतात यामुळेच वातावरण उबदार राहते आणि म्हणूनच पृथ्वीवर सजीव सृष्टी अस्तित्वात आहे आणि म्हणून यांना हरित वायु म्हणतात. हे घटक नसते तर वातावरणाचे तापमान खूप कमी असते आणि सजीव जिवंत राहू शकले नसते. वाढत्या प्रदूषणामुळे मात्र वातावरणातील या घटकांचे प्रमाण सामान्यापेक्षा वाढते आहे. परिणामी गर्मी वाढतेय यालाच आपण ग्लोबल वॉर्मिंग म्हणतो. जळण्याच्या क्रियेस ऑक्सिजन लागतो आणि कार्बनडायऑक्साईड बाहेर पडतो हे आपण शाळेत शिकलो पण कचरा जाळणे या आपल्या सहज होणाऱ्या क्रियामुळे देखील वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईड वाढतो हे आपल्याला माहितीही नसते. वाढती गाड्यांची संख्या पण पेट्रोल, डिझेल चे ज्वलन वाढवते. गर्मी होते म्हणून आपण एसी लावतो आणि थंडगार हवेत आनंदाने राहतो पण क्लोरोफ्लूरोकार्बन हवेतील उष्णता वाढवतो याची जाणीव आपल्याला नसते. याचा अर्थ वीज वापरू नका, गाडी चालवू नका, एसी वापरू नका असा नक्कीच नाही पण वापरतांना भान ठेवा इतकंच.

गेल्या आठवड्यातील लेख लिहून झाला आणि शेतातील माणसाला, रमेशला साप चावला असा त्याचा फोन आला. आमचं तर अक्षरशः धाबं दणाणलं. पटापट हालचाली केल्या आणि तासाभराच्या आत त्याला इर्विनला ऍडमिट केले. साप 'घोणस' जातीचा अतिविषारी असल्याचे कळल्याने काळजी आणखीनच वाढली. इर्विनचा एकूणच कारभार आपण फक्त ऐकून असतो पण प्रत्यक्ष त्याहूनही भयानक असल्याचा अनुभव आला. पण सरकारी दवाखान्याशिवाय इतरत्र साप चावण्यावर औषधोपचार होत नसल्याने नाईलाज झाला. एका पलंगावर दोन रुग्ण, काही जमिनीवर इतकी गर्दी. अस्वच्छता इतकी की चांगला माणुस आजारी पडेल. यासगळ्या धावपळीत आमच्या मित्रमंडळींनी खूप मदत केली त्यामुळे रमेशचे प्राण वाचले त्या सगळ्यांच्या रमेश आणि आम्ही कायम ऋणात राहू. काहींनी तर त्याला बघितले देखील नाहीये. जीवावरचे संकट टळले आणि गुरुवारी तो शेतावर परतला पण पायावर खूप सूज आहे. त्याला पूर्ण बरा व्हायला कदाचित काही महिने लागतील असं जाणकारांच मत आहे. अजुनही औषधोपचार सुरु आहेत. सध्या सीताफळाच्या काढणीची वेळ आहे त्यामुळे आता संकट आमच्यावर आहे कारण सीताफळं तोडणे, क्रेटमध्ये भरणे आणि क्रेट गाडीत चढवणे आम्हा दोघांकडून होणे अशक्य आहे. गावात मजूर मिळणे अवघड आहे. शनिवारी सीताफळं पिकून खाली पडू लागली असा त्याचा फोन आला म्हणून दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर सीताफळाची पहिली तोडणी केली. यंदा सतत च्या पावसामुळे एकदा कापलेले गवत पुन्हा जोमात वाढून जवळपास पाच फुट उंच झाले त्यामुळे हे गवत पुन्हा कापण्याचे काम करतांना साप चावला आणि काम ठप्प झाले.वास्तविक गवतातून फिरतांना पायात बूट घालायचेच (गम बूट आणि रबरी बूट आणून दिले आहेत) हे वारंवार सांगूनही तो अनवाणी किंवा स्लीपर घालुन फिरतो. शनिवारी आम्ही एवढ्या गवतातून फळं काढली. रमेश ची बायको सोबतीला घेतली आणि पहिला तोडा घरी आणला. इतके दिवस आपण सगळेच ज्यांची वाट बघत होतो ती सीताफळं आता पिकायला लगली आहेत. आता पुढील महिना सीताफळ तोडणी सुरु राहील. यंदा अतिपावसामुळे बहर कमी आहे, त्यात हे नवीन संकट. शेतीत सगळंच अनिश्चित हे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

● डॉ स्मिता श. जोशी
मो. ९४०५९०८५५८

प्रत्येक जिल्ह्यात मंदिर

सत्तेत आल्यास प्रत्येक जिल्ह्यात शिवाजी महाराजांची मंदिर बांधणार असल्याची घोषणा उद्धव ठाकरे यांनी केलेली आहे. शिवाजी महाराजांच्या प्रति अत्याधिक आदर मनात असताना देखील उद्धव ठाकरे यांच्या घोषणेचे समर्थन करावे असे वाटत नाही. ज्याच्या जवळ करण्या सारखे काहीच नाही तोच मनुष्य अथवा पक्ष मंदिर बांधण्याची भाषा बोलत असतो असे मला वाटते. एखादा माणूस जर करोडो लोकांच्या हृदयात घर करून असेल तर त्याला त्या ठिकाणाहून काढून मंदिरात नेऊन बसवण्यात काही हशील आहे असे मला वाटत नाही. महाराजांचे पुतळे केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर विदेशात देखील उभे असल्याचे आपल्याला दिसून येईल. पुतळे उभारून खरंच प्रेरणा मिळते का? असे वि.वा. शिरवाडकरांनी म्हटले आहे. तरीसुद्धा प्रेरणा मिळवणे हा एकमेव उद्देश पुतळा उभारण्या मागे असतो. मंदिर उभारण्या मागे मात्र प्रेरणा मिळवण्याचा उद्देश अजिबात नसतो. कारण मंदिरात पूजा केली जाते. तुम्ही ज्यावेळी संकटात असता त्यावेळी देवापुढे बसून संकट निवारण करण्याची प्रार्थना तुम्ही करत असता. या संकटातून देवच आपल्याला तारुन नेणार असल्याची श्रद्धा तुमच्या मनामध्ये असते. देव वाचवणार याचा अर्थ आता इथून पुढे मी स्वतःहून संकटातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करणार नाही असाही होतो. परंतु हातामध्ये तलवार घेऊन असलेला महाराजांचा अश्वारूढ पुतळा. तुम्हाला कधीही समोर बसून आपल्या संकटावर अश्रू ढाळण्याची प्रेरणा देणार नाही. त्या हाता मधील तलवार तुम्हाला संदेश देत आहे. की, शून्यातून स्वराज्याची निर्मिती झालेली आहे. महाराष्ट्राच्या जनतेचे रडगाणे घेऊन महाराज एखाद्या मंदिरात जाऊन बसले असते. तर हिंदवी स्वराज्याची स्थापना कधीच होऊ शकली नसती. मागे कोकणात तारकर्ली इथे गेलो असताना सिंधुदुर्ग किल्ला बघितला होता. या किल्ल्यावर शिवाजी महाराजांचे महाराष्ट्रातील एकमेव मंदिर असल्याचे सांगितले गेले. त्या ठिकाणी महाराजांच्या पावलाचे ठसे देखील जतन करून ठेवण्यात आलेले आहेत. आंध्र प्रदेशातील श्री शैलम येथील महाराजांचे स्मारक, स्फूर्ती स्थान म्हणून जतन करण्यात आले आहे. काही लोक त्याचाही उल्लेख महाराजांचे मंदिर असाच करतात. परंतु महाराजांचे मंदिर या दोन ठिकाणा पुरताच मर्यादित राहिले नसावे असे वाटते. आपल्या भारतात कोण, कधी, कोणाचे मंदिर बांधेल याचा नेम नसतो. परंतु महाराजांचे मंदिर ही कल्पना मनाला पटत नाही. महाराजांचे प्रत्येक स्मारक आणि प्रत्येक पुतळा यांना प्रेरणास्थान अथवा स्फूर्ती स्थान म्हणूनच ओळखले गेले पाहिजे.



आज महाराष्ट्रात सर्वात जास्त ओरड कशावर होत असेल तर ती सरकारच्या लाडकी बहिण योजनेवर होत आहे. अगदी या सरकार मधील अनेक नेत्यांनी या योजनेवर टीका करत सरकारला घरचा अहेर दिला आहे. विद्यार्थ्यांच्या स्कॉलरशिपचा पैसा थांबवून हे सरकार लाडक्या बहिणीचे लाड पुरवण्याचा अट्टाहास करत आहे. सरकारी तिजोरीत पैशांचा खडखडाट झाला आहे ही बाब स्पष्ट आहे. अशा परिस्थितीत या सरकारने आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आणून ठेवलेल्या राज्याला कशाप्रकारे सावरता येईल. या विषयी योजना आखायच्या की, प्रत्येक जिल्ह्यात शिवाजी महाराजांचे मंदिर बांधण्याची घोषणा करत त्या मंदिराच्या बांधकामा करता, कर्ज उभारणीच्या योजना आखायच्या हा महत्त्वाचा प्रश्न आहे. मोकळ्या जागेवर उभारलेले पुतळे वाऱ्यामुळे कोसळण्याची भीती असते. म्हणून महाराजांना बंदिस्त करण्याची योजना आखली जात आहे का हा महत्त्वाचा प्रश्न आहे. एखादी जनहिताची घोषणा आणि मंदिर उभारण्याची घोषणा, अशा दोन्ही घोषणा जर कुण्या राजकीय पक्षानी एका सोबतच केल्या. तर त्या मधील मंदिर उभारणीची घोषणा ताबडतोब कार्यान्वित होते आणि जनहिताची योजना धूळखात पडते. ही भारतातील वस्तुस्थिती आहे. म्हणूनच आपल्या प्रत्येक वर्षी दोन करोड रोजगार या घोषणेला कार्यान्वित करण्या करता गेल्या दहा वर्षात नरेंद्र मोदी यांनी कोणताच प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. या वर्षीच्या निवडणुका जिंकण्या करता. त्यांनी आपली संपूर्ण शक्ती राम मंदिराच्या उभारणीतच खर्च केली होती. निकृष्ट दर्जाचे बांधकाम असलेले का होईना. परंतु निवडणुकी पूर्वी हे मंदिर जनतेच्या स्वाधीन करायचेच असा पणच जणू काही पंतप्रधानांनी केलेला होता.

आज महाराष्ट्र सरकारच्या दिवाळखोरीच्या घोषणांकडे बघता आशेचा एक किरण म्हणून आपण महाविकास आघाडीकडे निश्चितपणे बघू शकतो. या महाविकास आघाडीने उद्धव ठाकरे यांनाच आपला मुख्यमंत्री पदाचा उमेदवार घोषित करावा अशी मागणी होत आहे. मग आमचा भावी मुख्यमंत्री आम्हाला शिवाजी महाराजांचे मंदिर बांधू देणार आहे. यावरच महाराष्ट्रातील जनतेने खुश व्हायचे का हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यांनी रामाचे मंदिर बांधले म्हणून तूम्ही शिवाजी महाराजांचे मंदिर बांधून देणार असाल. तर तुमच्यात आणि त्यांच्यात फरक काय हा महत्त्वाचा प्रश्न आहे. हंगर इंडेक्स मध्ये आपण जगात १०५ व्या क्रमांकावर आलेलो असल्याच्या बातम्या ऐकायला मिळत आहेत. नेपाळ सारखा देश भारतापेक्षा चांगल्या अवस्थेत आहे. याची लाज आम्ही कधी बाळगणार आहोत हा महत्त्वाचा प्रश्न आहे. मंदिर बांधून त्याच्या समोरील भिकाऱ्यांची संख्या वाढवून उपासमारीचा प्रश्न सुटणार नाही हे लक्षात घेतले पाहिजे. पाच किलो फुकटच्या धान्यामुळे जनतेला फुकटचे अन्न खाण्याची सवय लागली आहे. आपल्या जवळ असलेला अतिरिक्त तांदूळ बाजारात विकून त्याचे देखील पैसे केल्या जात असल्याची बाब मी यापूर्वीच्या लेखात नमूद केलेली आहे. आता लाडकी बहीण योजनेमुळे ग्रामीण भागात शेतावर काम करण्याकरता मजूर मिळत नसल्याची ओरड होत आहे. पाच किलो धान्याच्या ऐवजी तुमच्या हाताला काम देतो असे आश्वासन जर कोणी जनतेला दिले. तर जनता त्याला प्रतिसाद देईल का असा प्रश्न निर्माण होत आहे. परंतु अशा प्रकारच्या लहानसहान प्रलोभनाच्या बदल्यात तुम्ही आपले स्वतंत्र गहाण टाकू नका. असे समजावून सांगणाऱ्या नेत्याची आज समाजाला गरज आहे. मंदिराच्या उभारणीत या देशातील जनतेचे भले नसल्याचे समजावून सांगणाऱ्या नेत्याची आज या देशाला गरज आहे. मालवण मध्ये शिवाजी महाराजांच्या पुतळ्यात, महायुती सरकारने भ्रष्टाचार केल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला आहे. त्यांनी भ्रष्टाचार केल्यामुळेच तो पुतळा कोसळला हे देखील सत्य आहे. परंतु त्या पुतळ्याच्या कोसळण्यामुळे ज्या वेदना सर्वसामान्य जनतेला झालेल्या आहेत. त्या वेदनांवरती फुंकर म्हणून महाराजांचे मंदिर उभारणे हा उपाय होऊ शकत नाही, हे उद्धव ठाकरे यांनी लक्षात घेतले पाहिजे. मुंबईच्या शिवाजी पार्कवर शिवसेनेचा मेळावा असल्यामुळे या मेळाव्यात शिवसेनाप्रमुखांनी शिवाजी महाराजांवर बोलणे अपेक्षितच होते. परंतु बदलापूर सारख्या घटना अजून शिळ्या झालेल्या नाहीत हेसुद्धा लक्षात घ्यायला पाहिजे होते. महाराजांचे मंदिर उभारून महिलांवरील अत्याचार कमी होणार नाहीत. आपल्या राज्यातील महिला सुरक्षित असाव्यात. या दृष्टिकोनातून आपल्या भावी योजना काय असतील हे दसऱ्याच्या मेळाव्यात सांगणे अपेक्षित होते. आज वर्तमानपत्रातील हेडलाईन्स उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या मंदिर बांधण्याच्या आश्वासना खेरीज दुसरे काहीच दाखवत नाही. याचा अर्थ महाराष्ट्रातील सर्वच प्रश्न संपलेले आहेत असा घ्यायचा का हा महत्त्वाचा प्रश्न आहे. सुजलाम सुफलाम महाराष्ट्र मध्ये सोयाबीनला भाव मिळत नाही म्हणून कास्तकार हवालदील झाला आहे.त्याच्या प्रश्नाला कोणत्या पक्षाच्या जाहीर सभेतून वाचा फोडली जाणार आहे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. उद्धव ठाकरे जवळपास अडीच वर्ष महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. मुख्यमंत्रीपद गेले त्यावेळी ते मुख्यमंत्री म्हणून लोकप्रियतेच्या शिखरावर होते. करोना सारख्या संकटाचा त्यांनी अतिशय धीरोदत्तपणे सामना केल्याचे आपण बघितले आहे. म्हणूनच आज सुद्धा महाविकास आघाडी मधील मुख्यमंत्री पदाचा चेहरा हा उद्धव ठाकरे यांचाच असावा. अशी महाराष्ट्रातील जनतेचे इच्छा आहे. परंतु त्यांनी दिलेले शिवाजी महाराजांचे मंदिर बांधण्याचे आश्वासन मनाला पटलेले नाही म्हणून हा लेखन प्रपंच आहे एवढेच.

● पंकज वैद्य
अमरावती
मो. ९८२३०१४०४०

सहज सुचलं म्हणून....

माणसाच्या मनावर काही अनिष्ट गोष्टींचा प्रभाव असला तर खरोखरच स्वतः बरोबरच काही वेळेस एखाद्या निर्दोष व्यक्तीच्या आयुष्याची पण त्या अनिष्ट गोष्टीमुळे वाट लागू शकते. ह्या काही वाट लावणा-या गोष्टींपैकी प्रमुख गोष्ट म्हणजे गैरसमज.

मानवी मन ह्या संकल्पनेच जर अस्तित्व मान्य केलं तर ह्याची व्याप्ती किती खोलवर रुतून बसली आहे ह्याची जाणीव होते. खूप वेळा अनुभवाने लक्षात येतं की गैरसमजूतीचा फक्त एकच क्षण खूप धोकादायक ठरु शकतो कारण आपण एकत्र घालवलेल्या काळाचा काही मिनीटांमध्येच संपूर्णपणे विसर पाडण्याची ताकद त्यावेळेच्या संभ्रमित मनामध्ये एकवटलेली असते.

मानवी नातेसंबंधांतील सर्वात भयंकर धोक्यांमध्ये गैरसमज ही कीड महाभयंकर प्रकोप निर्माण करणारी आहे हे नक्की. गैरसमज अशी गोष्ट आहे जी चटकन् आपला प्रभाव मनामनांत निर्माण करण्याचं काम शिताफीने करते. प्रसंग व काळ-वेळेची तमा न बाळगणारा आणि मनुष्याच्या मानसिकतेला लगेचच इजा पोचवण्याची क्षमता असणारा असा हा 'गैरसमज' आपल्या सुखाला अक्षरशः ग्रहण लावण्याचं काम करतो. घराघरांत हा नांदायला लागल्यापासून जवळ असलेल्या मनामनांना हा दुरावण्याचं कामं करतो.

गैरसमज ही एक मानवी मनावर नियंत्रण नसलेली गोष्ट आहे हा एक मोठ्ठा गैरसमज. जरा प्रसंगी आताताई विचार न करता शांतपणे परिस्थितीचा सर्वांगीण बाजूने विचार करायचे ठरविले तर कदाचित आपलं समजणं किती चुकीच्या दिशेने धावतयं ह्याची जाणीव होते.मन आणि नातेसंबंधांच्या गुंतागुंतीतून निर्माण झालेला, काही वेळा गोड, तर बरेचदा कटू असणारा असा हा घटक.

'गैरसमज' याचा नेमका अर्थ काय? गैरसमज म्हणजे योग्य समज करून घेण्यात आलेले अपयश. एखादा तंटा, मतभेद, एखादे बोलणे, वागणे, भूमिका, दृष्टिकोन यांचे योग्य ते अवलोकन करण्यात वा त्यांचा अर्थ समजावून घेण्यातील आपली चूक. एखाद्या शब्दाचा, प्रसंगाचा, हेतूचा चुकीचा अर्थ लावून त्यावर दृढ विश्वास ठेवणे, असाही त्याचा अर्थ असू शकतो. या सर्व शाब्दिक अर्थामध्ये अपयश, चूक या शब्दांवरून ही मन:स्थिती नकारात्मक आहे, हे वेगळे सांगायला नको.

दोन व्यक्तींतील चर्चेची भाषा भिन्न असल्याने एकाला दुसऱ्याची भाषा न समजल्याने गैरसमज निर्माण होऊ शकतात. या अडचणीपलीकडे मुळातच संवाद नसणे वा अपूर्ण स्वरूपाचा असणे, किंवा अयोग्य संवादशैलीचा वापर यानेही गैरसमज होऊ शकतात. गैरसमज बऱ्याचदा आपल्या अंगवळणी पडलेला असतो. एखादा शब्द, वाक्य, भूमिका, दृष्टिकोन, घटना वा व्यक्तीबाबत चटकन् काहीएक 'समज' करून घेऊन त्याचे गैरसमजात रूपांतर होत असावे.

गैरसमज जसा सुलभ तसाच सर्वव्यापी आहे. गैरसमजामुळे व्यक्तीची मानसिकता, 'स्व'त्वाच्या कल्पना, करीअर व परस्परसंबंधांतील सौख्य, सबुरी, विश्वास, आत्मीयता, आशा, इच्छा यांना ठेच पोहोचते. त्यांच्यात अंतराय निर्माण होतो. भांडणे होतात. त्याने प्रगती खुंटते. आपल्या आयुष्यावर अधिराज्य गाजवणाऱ्या या गैरसमजांना ठाम नकार देणे गरजेचे आहे. खरं तर प्रथम त्याची निर्मितीच होऊ देऊ नये. अनवधानाने वा दुर्लक्षामुळे किंवा अज्ञानामुळे तो झालाच, तर दीर्घकाळ त्यास थारा देऊ नये. यासाठी योग्य ती पावले वेळीच उचलणे फायद्याचे ठरेल. गैरसमज दूर ठेवण्यासाठी प्रथम आपल्या वैचारिक चुका ,बऱ्याचदा अनवधानाने वा त्याच्या असण्याबद्दलच्या अज्ञानामुळे होणाऱ्या, टाळायला हव्यात. वैचारिक चुका या काही विशिष्ट व अयोग्य विचार, भावना व वर्तनशैलीतून घडतात आणि गैरसमजास निमंत्रण देतात. यास्तव आपल्या हातून चूक तर होत नाहीए ना, हे आधी पडताळून पाहावे. केवळ दोन टोकांचा विचार करणे, त्यामुळे सुवर्णमध्य न साधता येणे, हे किंवा 'ते' च.. अधेमधे काहीच नाही, त्यामुळे सर्व बाबींच्या विचारांकडे दुर्लक्ष, आपल्या सोयीनुसार प्रसंग किंवा समोरच्याच्या हेतूचा/ शब्दांचा अर्थ लावणे, शंका घेणे, समोरच्या व्यक्तीच्या हेतू वा भूमिकेवर थोडक्या किंवा अज्ञात माहितीच्या आधारे त्वरित निष्कर्षाप्रत येणे, आपण दुसऱ्याचे मन सहज आणि योग्यच वाचू शकतो असा भ्रम वा ग्रह करून घेण, छोट्या छोट्या गोष्टींचा बागुलबुवा करणे, सत्य पडताळून न पाहता सहज उपलब्ध माहितीवर विसंबून इतरांशी वागणे व बोलणे बदलणे, इतर व्यक्तींप्रति पूर्वग्रहदूषित विचार व वर्तन.. या व इतर वैचारिक साशंकतेमुळे आपल्याला बऱ्याचदा सुस्पष्ट दृष्टी ठेवणे कठीण जाते. त्यामुळे ग्रह करून घेऊन, तो योग्य की अयोग्य पडताळून न पाहणे; किंबहुना मी केलेला विचार योग्यच आहे, या अहंभावातून निर्माण झालेल्या विचाराला छेद देणे आपण टाळतो. या कारणांमुळेच गैरसमज झालेल्या घटनेशी किंवा व्यक्तीशी आपले आपुलकीचे वा आत्मीय संबंध राहत नाहीत.

गैरसमज दूर करण्यासाठी प्रयत्नशील राहावं लागतं. मेहनत घेऊन सत्य शोधावं लागतं. काही वेळा पडती बाजू घ्यावी लागते. या सगळ्यासाठी आपली मानसिक तयारी कमी पडते. म्हणूनच आपण गैरसमजात राहून, दुसऱ्याला नावे ठेवून, स्वत:कडे 'बिचारे'पण घेणे सोयीचे, सवयीचे समजतो. आणि गैरसमज दूर करण्याच्या प्रयत्नांमध्ये वाया जातोय असा वाटणारा वेळ व शक्ती वाचवतो. गैरसमज दूर न करणे म्हणजे बरेच धागे सैल व सुटे ठेवण्यासारखेच आहे. असे किती धागे या स्थितीत ठेवणे आपल्याला परवडण्यासारखे आहे याचा आपणच विचार करावा. गैरसमजाचा हा धागा सुटा असल्याने नियंत्रणरहित होऊ द्यायचा, की त्याला योग्य व सुज्ञ 'समजा'च्या कुलपात अडकवून जीवन जटील व गुंतागुंतीचे न करता नातेसंबंधांचा आस्वाद घ्यायचा आणि प्रगतिशील राहायचे, हे आपल्यालाच ठरवायला हवे.

गैरसमजाला थारा द्यायचा नसेल तर प्रथम समोरच्या व्यक्तीचे म्हणणे शांतपणे आणि संवेदनशीलतेने ऐकून घ्यायची सवय करावी लागते. समोरच्या व्यक्तीच्या म्हणण्याला आपल्या चष्म्यातून पाहून लेबल लावण्या ऐवजी ते ऐकून व समजून घ्यावं. समजलेले योग्य आहे का, ते पुन्हा पडताळून पाह्यलं तर कदाचित गैरसमजाला स्थानचं उरणार नाही. समोरच्या व्यक्तीला जे म्हणायचे आहे व आपल्याला जे समजले आहे ते जर सारखेच असेल तर गैरसमजाला थारा मिळणे कठीण. आपली संवादशैली, शब्दांची निवड, देहबोली, आवाजाचा स्वर व बोलण्याचा वेग यावर प्रयत्नपूर्वक नियंत्रण आणले व समन्वय साधला तर संवाद आणि होणारा 'समज' यांत आणि पर्यायाने नातेसंबंधांमध्ये पारदर्शकता येईल आणि ही पारदर्शकता लाभदायक ठरुन परत आपल्यात सुसंवादाचा पूल सांधल्या जाईल हे नक्की.

गैरसमजाला थारा द्यायचा नाही ही मनोमन ईच्छा असली तर नाण्याला नेहमीच दोन बाजू असतात हे आपल्या मेंदूत कोरुन ठेवले पाहिजे. मी तर बरेच वेळा मनात गैरसमजाचा किडा वळवळायला सुरवात झाली की लगेच समोरच्या भुमिकेत समरस होते त्यामुळे बरेचदा आपल्याला आपल्या चुका कळतात, किंवा त्यातून बाहेर पडायचा योग्य मार्ग सापडतो. गैरसमज हा पाच अक्षरी शब्द पाच सेकंदात आपल्या मनाचा ताबा घेऊन त्याची घडी बिघडवू शकतो.त्यामुळे ह्या मनाच्या अस्वस्थतेचं, तगमगीचं कारण असलेल्या गैरसमजाला समूळ उखडून टाकलेच पाहिजे.

● सौ. कल्याणी बापट (केळकर)
बडनेरा, अमरावती, मो.९६०४९४७२५६

चारोळी

नागपु(णे)री मिसळ

सुटता तिढा सुटेना

आज मी रुसून आहे
सुटता तिढा सुटेना ।
होई अनेक बैठका
जागावाटप जमेना ।।

● रवि चोपडे , पुणे, मो. ९०२८५४४४६१